# - प्रेस नोट -

दि. २७/०९/२०२६

## शिवाजीनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.२५/०९/२०२६ रोजी २१.३० वा ते २१.४५ वा. च्या दरम्यान फिर्यादी शादाब अब्दुल कुद्दुस सिद्धीकी, वय- २६ वर्षे, धंदा- कडीया काम, रा.ठी. जुना बस डेपो, ज्ञानसाधना स्कुलच्या पाठीमागे, उमरखडी, बैगणवाडी, गोवंडी, मुंबई यांच्या राहते घरा शेजारी परीसरातील अटक आरोपी पुरुष क्र.०१ वय-२९ वर्षे याने त्याचे अंगावर फिर्यादीचे घराचे पाईपचे पाणी उडाल्याचे कारणावरुन फिर्यादीचा भाऊ जाहिद याचे सोबत शिवीगाळ करत वाद घातला असता सोडवा सोडव करत असताना अटक आरोपी पुरुष क्र.०१ वय-२९ वर्षे याचे डोक्यास भिंत लागुन दुखापत झाल्याचा राग मनात धरुन अटक आरोपी पुरुष क्र.०१ वय-२९ वर्षे बघुन घेण्याची धमकी देवुन निघुन गेला व त्याचा भाऊ अटक आरोपी पुरुष क्र.०२ वय २६ याला फिर्यादीचा भाऊ जाहिद याचे सोबत भांडण करण्यासाठी सोबत घेवुन आला असता अटक आरोपी क्र.०१ व क्र.०२ हे फिर्यादीचा भाउ जाहिद याला मारहाण करु लागले असता त्यांना समजवण्यासाठी फिर्यादीचा भाऊ साकिब गेला असता अटक आरोपी क्र. ०२ याने सोबत आनलेल्या सुऱ्याने जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने साकिब याचे पोटात चाकु खुपसुन व त्याचे डोक्यावर वार करत असताना साकिब याने डवा हात मध्ये घातल्याने डाव्या हाताच्या मनगटावर वार करुन गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी सोडवण्यास गेले असता फिर्यादीचे उजव्या हाताचे तळव्यावर चाकुने वार करुन फिर्यादीला जखमी केले म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२६/०९/२०२६ रोजी गु.र.क्र. ८१४/२६, कलम १०९(१), ११५(२), ३५३(२), ३५२, ३(५) बीएनएस २०२३, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------